# अपंग समावेशित शिक्षण उपक्रम

- यामध्ये विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये टिकवुन ठेवण्यासाठी वैद्यकीय व शैक्षणिक सहाय्यभुत सेवा प्रदान करण्यात येतात.
- वैद्यकीय सहाय्यभुत सेवा- मोफत शालेय आरोग्य तपासणी, संदर्भीत विद्यार्थ्यांसाठी शासकीय रूग्णालयात शस्त्रक्रिया, बुध्यांक तपासणी, श्रवण तपासणी व बेरा टेस्टींग शिबीर इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात.
- शैक्षणिक सहाय्यभुत सेवा- विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा परिसरात ये-जा करण्यासाठी मदतनिस भत्ता, शाळा दुर असल्यास वाहतुक भत्ता इत्यादी सुविधा देण्यात येतात.
- अपंग विद्यार्थ्यांच्या क्रिडा स्पर्धा, थेरेपी सेंटर खर्च, बहुअपंग प्रवर्ग प्रशिक्षण, तीन चाकी सायकल, व्हील चेअर, रोलेटर, कुबडया, कॅलीपर इत्यादीसाठी सुविधा पुरविण्यात येतात.

अपंग मुलांना इतर मुलांप्रमाणे सुप्त गुणांचा विकास व्हावा म्हणून या मुलांच्या क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. जनजागृतीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जनजागृती प्रभातफेरी, प्रत्येक तालुकास्तरावर अद्यावत संसाधन कक्ष निर्मिती करण्यात आली. अपंग मुलांच्या पालकांना तज्ञ डॉक्टरांमार्फत या मुलांच्या सांभाळण्यासाठी येणा-या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी पालकमेळावे आयोजित करण्यात आले.